# PRECISION
Superspeciality Clinic & Diagnostics

Office No. 52/53, Mahavir Centre, Sector 17, Vashi Navi Mumbai - 400703.
Watsap : +91 79778 70939 | Landline: 022 - 31583698
Instagram @precisionsuperspecialityclinic | Email: precisionsuperspeciality@gmail.com


प्रिसिशन सुपरस्पेशालिटी क्लिनिक आणि डायग्नोस्टिक्स हे १५ पेक्षा अधिक वर्षांचा वैद्यकीय अनुभव असलेल्या पाच सुपरस्पेशालिटी तज्ज्ञांचे स्वप्न आहे. नवी मुंबईतील नागरिकांना सर्वसमावेशक बाह्यरुग्ण सेवा एकत्रितपणे आणि दर्जात्मक पद्धतीने देण्याचा समान उद्देश या क्लिनिकच्या स्थापनेमागे आहे. सेक्टर १७, वाशी ,नवी मुंबईच्या मध्यवती भागात स्थित हे केंद्र विविध क्षेत्रातील सुपरस्पेशालिटी तज्ज्ञांच्या सल्ल्यांसह सुसज्ज आहे. येथे पूर्णपणे सुसज्ज प्रयोगशाळा, सर्व प्रकारच्या रक्त तपासण्या, बायोप्सी, फ्रोजन सेक्शन तसेच जनुकीय तपासण्या उपलब्ध आहेत. याशिवाय, रेडिओलॉजी विभागात एक्स-रे, कॉन्ट्रास्ट अभ्यास, सोनोग्राफी, लिव्हर इलॅस्टोग्राफी, भ्रूण अभ्यास (Fetal Studies) तसेच वरत्रमार्गदर्शित टॅपिंग, बायोप्सी यांसारख्या प्रक्रिया करण्यात येतात. रुग्णांच्या सोयीसाठी पूर्ण सुसज्ज औषध वितरण केंद्र आणि शस्त्रक्रियेसाठी लागणाऱ्या सामग्रींचे स्टोअरदेखील एकाच छताखाली आणि अत्यंत वाजवीदरात उपलब्ध आहे. आमचे ध्येय येत्या काही वर्षांमध्ये वैद्यकीय सेवेच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण मैलाचा दगड ठरणे आणि अधिकाधिक रुग्णांचे जीवन स्पर्शून त्यांना आरोग्यदायी व आनंदी आयुष्य जगण्यास मदत करणे हे आहे.

## थोरॅसिक शस्त्रक्रिया : एक अचूक व कौशल्यपूर्ण क्षेत्र



**Dr. Prriya Eshpuniyani**
Minimally Invasive Thoracic **Surgeon**
(VATS & Robotic)
Contact: 9007038159
Instagram: drpriyaeshpuniyani

थोरॅसिक (छातीसंबंधित) शस्त्रक्रिया ही शल्यचिकित्सेतील अत्यंत कौशल्य व अचूकता लागणारी विशेष शाखा आहे. छातीमध्ये फुफ्फुसे, हृदय, अन्ननलिका, महत्त्वाची रक्तवाहिन्या व श्वसननलिका या अत्यावश्यक अवयवांचे अस्तित्व असते. हे अवयव एकमेकांना घट्ट लागून असल्याने तेथे अत्यंत अचूकतेने काम करणे आवश्यक असते. जवळच्या संरचनांना (उदा. हृदय, मुख्य रक्तवाहिन्या) इजा झाल्यास ती घातक ठरू शकते. त्यामुळे अशा शस्त्रक्रियेसाठी विशेष कौशल्य, अनुभवी टीम, आणि काळजीपूर्वक व्यवस्थापन अत्यावश्यक असते. पूर्वी या शस्त्रक्रिया मोठ्या चिरा करून (ओपन थोरॅकोटॉमी) केल्या जात होत्या. अजूनही मोठे ट्यूमर, आपत्कालीन शस्त्रक्रिया करताना या पद्धतीची गरज असते. मात्र, या पद्धतीचे काही तोटे आहेत:

१. **अत्याधिक वेदना**
२. **बरे होण्याकरिता अधिक कालावधी**
३. **संसर्गाचा अधिक धोका**
४. **श्वसनासंबंधी गुंतागुंत**

मात्र, गेल्या दोन दशकांत या क्षेत्रात मोठी क्रांती झाली आहे. आता अधिकाधिक शस्त्रक्रिया VATS (Video Assisted Thoracic Surgery) च्या माध्यमातून म्हणजेच ''लघु छिद्र शस्त्रक्रिया'' केली जात आहेत. या पद्धतीत शस्त्रक्रियेसाठी फक्त २ ते ४ लहान चिरे (१-३ सेमी) बरगडयांमध्ये घेतले जातात. त्यातून कॅमेरा व विशिष्ट उपकरणे शरीराच्या आतमध्ये टाकण्यात येतात. कॅमेरामधून मिळणारे थेट दृश्य स्क्रीनवर पाहून शल्यचिकित्सक छातीच्या आतील भागाचे बारकाईने परीक्षण व अत्यंत अचूक शस्त्रक्रिया करु शकतात. विशेष म्हणजे, उघडया शस्त्रक्रियेत सहजपणे न दिसणाऱ्या अगदी कोपऱ्यातील भागाचेदेखील दृश्य मिळते, त्यामुळे ही पद्धत अधिक अचूक ठरते.

**VATS पद्धतीचे फायदे:**

१. **जलद बरे होणे व लवकर रुग्णालयातून घरी सोडणे**
२. **लहान चिरे असल्यामुळे सौंदर्यदृष्ट्या चांगले कमी वेदना**
३. **न्यूमोनिया, हवेचा त्रास व जखमेतील संसर्ग यांचा धोका कमी**
४. **कर्करोगावरील परिणामही पारंपरिक शस्त्रक्रियेसारखेच (Comparable Oncologic Outcome)**

तथापि, थोरॅसिक शस्त्रक्रियेला उच्च कौशल्य व विशिष्ट प्रशिक्षण लागते. ही शस्त्रक्रिया अनुभवी आणि तज्ज्ञ थोरॅसिक सर्जननेच करणे योग्य ठरते. आज, थोरॅसिक शस्त्रक्रियेतील प्रगतीमुळे आणि VATS सारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे, आपण रुग्णांना अचूक, कमी त्रासदायक व उत्कृष्ट परिणाम देणाऱ्या शस्त्रक्रिया प्रदान करु शकतो.

## कर्करोगाचे वाढते प्रमाण आणि रोबोटद्वारे शल्यचिकित्सा



**Dr. Prasad pande**
MS, FMAS, DrNB GI Surgery
Gastrointestinal and
Hepatopancreatobiliary Surgeon

आजच्या धकाधकीच्या जीवनात कर्करोगासारख्या भयावह आजाराचे प्रमाण वाढत चालले आहे. अन्न व पाण्यातील भेसळ, प्रदूषण, कामाचा तणाव, हानिकारक जीवनशैली, वाढते मद्यपान व धूम्रपान, या सर्वांचे परिणाम शरीरावर कर्करोगाच्या रुपात दिसतात. पण आता कर्करोगाच्या इलाजाचे भरपूर पर्याय उपलब्ध आहेत. केमोथेरपी, रेडिएशन, तसेच शल्यक्रिया, या सर्वांमध्ये आमूलाग्र बदल मागील २० वर्षांत घडले आहेत. त्यामुळे पूर्वीसारखं कर्करोग आता मरणठेपेची शिक्षा राहिलेली नाही, तर कर्करोग झाल्यावरदेखील बऱ्यापैकी रुग्ण हे दीर्घकाळ नॉर्मल जीवन जगू शकतात. शल्यक्रियांच्या जगात रोबोटिक टेक्निकच्या आगमनाने शल्यक्रिया रुग्णासाठी सोपी, वेदनारहित, व सुसह्य झाली आहे. अन्ननलिका, लिव्हर (यकृत) व पॅंक्रियास (स्वादुपिंड) यांचे गुंतागुंतीचे ऑपरेशनदेखील सहजपणे आणि कुठल्याही प्रतिकूल परिणामाशिवाय यशस्वी करण्यासाठी रोबोटचा वापर होतो. यामुळे अशा नवीन टेक्नॉलॉजी व यंत्रणेचा फायदा जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचावा हा सर्व कर्करोग शल्यचिकित्सकांचा प्रयत्न असतो.


## कर्करोग आणि मानसोपचार



**डॉ.प्रियंका बानोकर पांडे**
कर्करोग मानसोपचारतज्ज्ञ

कर्करोग हे केवळ शारीरिकच नव्हे तर मानसिकदृष्टया ही गंभीर आव्हान आहे. निदानानंतर अनेक रुग्णांना भीती, चिंता, नैराश्य आणि असहायता वाटते. उपचारांच्या कठीण टप्प्यांमध्ये मानसिक आरोग्य सांभाळणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. कर्करोग मानसोपचार म्हणजे अशा रुग्णांसाठी मानसिक आधार, समुपदेशन आणि औषधोपचार यांचा समन्वय, कर्करोग रुग्णांसाठी मानसोपचार तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि योग्य मानसिक औषधे (सायको ट्रॉपिक्स) हे चिंता, नैराश्य आणि निद्रानाश यावर प्रभावी नियंत्रण ठेवून उपचारांची गुणवत्ता आणि जीवनमान सुधारण्यास महत्त्वपूर्ण ठरतात. रुग्णांच्या भावनिक स्थितीला समजून घेऊन त्यांना सकारात्मक राहण्यासाठी मदत करणे हा यामागचा हेतू असतो. डॉक्टर्स, मानसोपचारतज्ज्ञ आणि कुटुंबीय यांचा परस्पर सहकार्य रुग्णाच्या पुनर्वसनात मोठी भूमिका बजावतो. शरीरासोबतच मनही बरे राहावे, यासाठी कर्करोग मानसोपचार हा काळाची गरज आहे.

## संधिवात आणि ऑस्टिओआर्थरायटीस समजून घेणे : जनजागृती, निदान आणि उपचार



**डॉ. हरमन सिंग**
एम.डी.संधिवात तज्ज्ञ RH
क्लिनिक - कॅन्सर व संधिवात उपचार
केंद्र नवी मुंबई व ठाणे
Contact : 7208707760

मी, डॉ. हरमन सिंग, एम.डी., नवी मुंबईतील संधिवात तज्ज्ञ म्हणून, संधिवात (Rheumatoid Arthritis - RA) आणि ऑस्टिओआर्थरायटीस (Osteoarthritis - OA) या दोन सामान्य सांधेदुखीच्या आजारांबद्दल जनजागृती करण्याचा प्रयत्न करीत आहे. या दोन्ही विकारांचे प्रमाण वाढते आहे.मात्र योग्य माहितीच्या अभावामुळे निदान आणि उपचारांमध्ये उशीर होतो, ज्याचा थेट परिणाम रुग्णाच्या जीवनमानावर होतो.संधिवात (RA) हा एक स्वप्रतिरक्षा विकार आहे ज्यामध्ये शरीराची रोगप्रतिकारक यंत्रणा स्वत:च्या सांध्यांवर हल्ला करते. परिणामी, हात व पायांच्या बोटांसारख्या लहान सांध्यांमध्ये सूज, वेदना आणि जळजळ होते. हा विकार प्रामुख्याने ३० ते ५० वयोगटातील महिलांमध्ये जास्त आढळतो. मुख्य लक्षणांमध्ये सकाळची ३० मिनिटांपेक्षा जास्त टिकणारा कडकपणा, थकवा आणि दोन्ही बाजूच्या सांध्यांमध्ये समान वेदना यांचा समावेश होतो. वेळेवर निदान झाले नाही, तर संधिवात स्थायी विकृती व अपंगत्वास कारणीभूत ठरु शकतो.निदानासाठी रक्तचाचण्या (जसे की RF, anti-CCP) व इमेजिंग (एक्स-रे, सोनोग्राफी) आवश्यक असतात. उपचारामध्ये DMARDs (Disease Modifying Anti-Rheumatic Drugs), बायोलॉजिकल औषधे, तसेच व्यायाम, सकस आहार व तणाव व्यवस्थापन यांचा समावेश होतो. नियमितपणे संधिवात तज्ज्ञांचा सल्ला घेणे अत्यावश्यक आहे, जेणेकरुन गुंतागुंती टाळता येतील.ऑस्टिओआर्थरायटीस (OA) हा एक झीज होण्यामुळे होणारा संधीविकार आहे. यात सांध्यातील कार्टिलेज झिजते, त्यामुळे हिप, गुडघे आणि हातांचे सांधे यावर परिणाम होतो. हा विकार वाढत्या वयात, जास्त वजन असलेल्या व्यक्तींमध्ये किंवा आधीच्या सांध्यांच्या दुखापतीनंतर अधिक प्रमाणात दिसून येतो. लक्षणांमध्ये हालचालींमुळे वाढणारी सांधेदुखी, विश्रांतीनंतर अवयवांमधील कडकपणा आणि हालचालींमध्ये अडथळा यांचा समावेश होतो.निदानासाठी शारीरिक तपासणी, एक्स-रे आणि MR केले जातात. OA चे संपूर्ण उपचार शक्य नसले तरी फिजिओथेरपी, वजन नियंत्रण, वेदनाशामक औषधे आणि गंभीर प्रकरणांमध्ये सांधे प्रत्यारोपण यामार्फत वेदना कमी करता येतात व हालचाली सुधारता येतात.जनजागृती हेच मुख्य अस्त्र आहे. वाढत्या वयामुळे सांधेदुखी होत असेल, असा गैरसमज करून दुर्लक्ष करु नका. सांधेदुखी कायम राहिल्यास संधिवात तज्ज्ञांचा सल्ला घ्या. वेळेवर केलेले निदान आणि उपचार संधिवाताचा प्रादुर्भाव रोखू शकतात व ऑस्टिओआर्थरायटीसचा प्रभाव कमी करु शकतात.सांध्यांचे आरोग्य टिकवण्यासाठी खालील गोष्टी लक्षात ठेवा: वजन नियंत्रित ठेवा.नियमित व्यायाम करा.धूम्रपान टाळा.नवी मुंबईतील आरोग्य सेवा केंद्रे प्रगत निदान व उपचार सुविधा प्रदान करतात ,त्यांचा अवश्य लाभ घ्या. सांध्यांच्या आरोग्याला प्राधान्य देऊन एक वेदनामुक्त, सक्रिय आयुष्य जगूया.

## लहान मुलांमध्ये रोबोटिक शस्त्रक्रिया - आधुनिक वैद्यकीय क्षेत्रातील क्रांती



**Dr.Vipul Prakash Bothara**
Consultant Pediatric Laparoscopic
and Robotic Surgeon
Email id: vipulbothara@gmail.com
**Mobile: 9930921540**

आजच्या वेगाने विकसित होणाऱ्या वैद्यकीय तंत्रज्ञानाच्या युगात, रोबोटिक शस्त्रक्रिया (Robotic Surgery) ही एक मोठी क्रांती ठरली आहे. ही तंत्रज्ञान आधारित शस्त्रक्रिया पद्धत प्रामुख्याने प्रौढांमध्ये वापरली जात होती, परंतु आता ती लहान मुलांमध्येही प्रभावीपणे वापरली जात आहे. लहान वयातील रुग्णांमध्ये अत्यंत अचूकता आणि नाजूकतेची गरज असते, आणि यासाठी रोबोटिक प्रणाली अतिशय उपयुक्त ठरते.

**रोबोटिक शस्त्रक्रिया म्हणजे काय?**
रोबोटिक शस्त्रक्रिया म्हणजे डॉक्टर एका विशेष रोबोटिक प्रणालीच्या साहाय्याने शस्त्रक्रिया करतात. यामध्ये “da Vinci Surgical System” “SSI Mantra” सारख्या प्रगत उपकरणांचा वापर होतो, जे डॉक्टरच्या हालचाली अचूकपणे कॉपी करून रुग्णाच्या शरीरात छोटे छिद्र करून सूक्ष्मस्तरावर शस्त्रक्रिया करतात. या प्रक्रियेमुळे मोठ्या प्रमाणात उघडझाप न करता शरीरात अत्यंत अचूक आणि मर्यादित हालचाली करता येतात.

**लहान मुलांमध्ये रोबोटिक शस्त्रक्रियेचे फायदे**
लहान मुलांचे शरीर अतिशय नाजूक असते. पारंपरिक शस्त्रक्रियेत मोठी जखम, अधिक रक्तस्राव आणि जास्त वेळ रुग्णालयात राहण्याची गरज असते. रोबोटिक शस्त्रक्रियेमुळे हे सर्व धोके कमी होतात. काही महत्त्वाचे फायदे असे:

**लहान जखम:** छोटया छिद्रांद्वारे शस्त्रक्रिया केल्यामुळे मोठी जखम होत नाही.
**कमी वेदना आणि रक्तस्राव:** रोबोटिक प्रणाली अचूकपणे काम करते, त्यामुळे शस्त्रक्रियेनंतर वेदना आणि रक्तस्राव कमी होतो.
**जलद बरे होणे:** मुलांना लवकर घरी सोडता येते, आणि त्यांचे सामान्य जीवन लवकर सुरु होते.
**संसर्गाचा कमी धोका:** सूक्ष्म पद्धतीमुळे शरीरात कमी हस्तक्षेप होतो, त्यामुळे संसर्गाचे प्रमाणही कमी असते.
**शारीरिक ताण कमी:** लहान वयात मोठ्या प्रमाणावर शस्त्रक्रिया केल्यास भविष्यातील वाढीवर परिणाम होण्याची शक्यता असते, जी रोबोटिक पद्धतीत टाळता येते.

**कोणत्या प्रकारच्या शस्त्रक्रियांसाठी वापर?**
लहान मुलांमध्ये काही विशिष्ट समस्या रोबोटिक पद्धतीने सहज हाताळता येतात. उदा.:
* जन्मजात मूत्रमार्गातील अडथळे किंवा दोष (जसे की ureteropelvic junction obstruction)
* पचनसंस्थेतील दोष, जसे की Hirschsprung's disease **किंवा** esophageal, atresia किडनी व मूत्रपिंडाशी संबंधित आजार
* काही निवडक कर्करोगजन्य शस्त्रक्रिया

**निष्कर्ष :** लहान मुलांमध्ये रोबोटिक शस्त्रक्रिया ही एक आशादायक आणि सकारात्मक दिशा आहे. भविष्यात याचे अधिक प्रमाणात व अधिक किफायतशीर स्वरुपात प्रसार होईल, अशी अपेक्षा आहे. रोबोटिक शस्त्रक्रियेचा लाभ अधिकाधिक मुलांपर्यंत पोहोचवणे ही आजच्या वैद्यकीय क्षेत्रासमोरील महत्त्वाची जबाबदारी आहे.

## मणक्याची सोपी शस्त्रक्रिया: डॉ.अरविंद वटकर यांचे योगदान



**Dr. Arvind J. Vatkar**
MBBS, MS (Ortho), AFIH, MCh
(Edgehill Uni, UK)
Advanced spine fellowship
(Nottingham, UK)
Consultant Orthopaedic
and Spine Surgeon

डॉ. अरविंद वटकर हे नवी मुंबईतील फोर्टिस हिरानंदानी आणि अपोलो रुग्णालयात काम करणारे प्रसिद्ध मणक्याचे डॉक्टर आहेत. त्यांनी इंग्लंडमध्ये विशेष प्रशिक्षण घेतले आहे आणि किमान हस्तक्षेपाच्या मणक्याच्या शस्त्रक्रियेत (Minimally Invasive Spine Surgery - MISS) ते खूप निपुण आहेत. नवी मुंबईतील प्रेसिजन मल्टिस्पेशालिटी क्लिनिकमध्ये त्यांच्याकडे भेटीची वेळ घेऊन तुम्ही तुमच्या मणक्याच्या समस्यांवर सवोत्तम उपचार मिळवू शकता. ही शस्त्रक्रिया खूप सोपी आणि सुरक्षित आहे. यात एक खास मायक्रोस्कोप वापरतात, ज्यामुळे डॉक्टरांना खूप बारीक काम करता येते आणि धोका कमी होतो. काही छोटे-छोटे चीरे घेतले जातात, पण स्नायू आणि मऊ ऊतींना कमी इजा होते. विशेष नळ्या आणि स्क्रू वापरल्याने वेदना कमी होतात आणि रुग्ण लवकर बरा होतो. यामुळे रक्त कमी जाते, इन्फेक्शनचा धोका कमी होतो आणि रुग्ण लवकर घरी परत येतो. डॉ. वटकर केवळ या शस्त्रक्रियेतच तज्ज्ञ नाहीत, तर ते स्कोलियोसिस (मणक्याचा वाकडा होणे) दुरुस्ती, एपिड्युरल इंजेक्शन्स, व्हर्टेब्रोप्लास्टी आणि मणक्याच्या फ्रॅक्चरच्या शस्त्रक्रियाही करतात. मणक्याच्या डिस्कच्या समस्यांपासून ते गंभीर आजारांपर्यंत, ते सर्व उपचार अत्याधुनिक तंत्रज्ञानाने करतात. त्यांचा अनुभव आणि काळजीमुळे रुग्णांना जलद आणि सुरक्षित बरे होण्याची खात्री मिळते. डॉ.वटकर यांच्या प्रेसिजन मल्टिस्पेशालिटी क्लिनिकमध्ये भेटीची वेळ घ्या आणि तुमच्या मणक्याच्या समस्यांवर योग्य उपचार मिळवा. त्यांच्याकडे उपचार घेतल्याने तुम्ही लवकर बरे होऊन तुमच्या दैनंदिन कामात परत येऊ शकता. मणक्याच्या उपचारांचे भविष्य अनुभवा - आजच डॉ. वटकर यांच्याशी संपर्क साधा!

LMS





Happy Doctors Day

OUR SPECIALIST DOCTORS

**Dr. Hina Shaikh**
Consultant Obstetrician and Gynecologist
**Dr. Priyanka Banokar Pande**
Consultant Psychiatrist and Onco-Psychiatrist
**Dr. Amit Vatkar**
Pediatric Neurologist
**Dr. Harman Singh**
Consultant Rheumatologist
**Dr. Shazia Waghoo**
Laparoscopic, Hernia and Breast Surgeon
**Madhuri Somani**
Registered Dietician
**Dr. Dipak Bhangale**
Gastroenterologist, Hepatologist and Interventional endoscopist
**Dr. Krupa Choksi**
Nephrologist

*The Chest Clinic*
**Dr Prriya Eshpuniyani**
DNB, DrNB Thoracic Surgery
Fellowship Surgical Oncology
FMAS,FAIS,MNAMS,FARIS
VATS and Robotic Thoracic (Chest) Surgeon

*Pulmocare Clinic*
**Dr. Amolkumar Achlerkar**
MBBS, TDD, FCCP (USA), CCEBDM
Consultant Pulmonologist

*Gastron Surgery Clinic*
**Dr. Prasad Pande**
MS, FMAS, DrNB GI Surgery
Gastrointestinal and Hepatopancreatobiliary Surgeon

*Little Heroes Surgical Clinic*
**Dr Vipul Prakash Bothara**
MBBS, DNB, MCh-Pediatric Surgery, FICRS
Pediatric & Neonatal Laparoscopic & Robotic Surgeon

*Vatkar Ortho Spine Care*
**Dr. Arvind J. Vatkar**
MBBS, MS (Ortho), AFIH, MCh (Edgehill Uni, UK)
Advanced spine fellowship (Nottingham, UK)
Consultant Orthopaedic and Spine Surgeon

OUR SERVICES

**MEDICAL :** Chest & General Medicine | Diabetology | Cardiology | Pediatrics | Psychiatry | Onco-psychiatry | Neurology | Pediatric Neurology | Gastroenterology | Rheumatology | Psychology

**SURGICAL :** Minimally Invasive & Robotic Surgery | Paediatric Surgery | Gastro - Intestinal Surgery | Thoracic Surgery | Breast Surgery | Head & Neck Cancer Surgery | Oncosurgery | General Surgery | Orthopedics & Spine Surgery | Obstetrics And Gynaecology